## बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ माहे जानेवारी २०११

## गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष—२,, गु.अ.वि., मुंबई
## गु.प्र.शा गु.र.क्र ०३/११ कलम ३८०, ३४ भा.दं.वि.
## दा.भ.मार्ग पो ठाणे गु.र.क्र ८२/१०.

१) गु.र.क्र व कलम — दा.भ.मार्ग पो ठाणे गु.र.क्र ८२/१० कलम ३८०,३४ भा.दं.वि.

२) गु.घ.दि व वेळ — दिनांक २५.०३.२०१० रोजी १४.०० वा ते २९.०३.२०१० रोजी १६.०० वा दरम्यान

३) गु.दा.दि. व वेळ — दिनांक २९.०४.२०१० रोजी १३.१० वा.

४) गुन्हा उघडकीस — दिनांक १८.०१.२०११

५) फिर्यादी — मेहुलकुमार विनयकुमार दोषी, वय ४२ वर्षे,

६) बळीत — मेहुलकुमार विनयकुमार दोषी, वय ४२ वषे

७) आरोपी अटक —१) शमशुददीन अहमदगणी हाशमी वय ४७ वर्षे
२) अजय कांतीलाल मेहता वय ४८ वर्षे
३) फरीद अहमद हाशमी वय ४७ वर्षे
४) चंद्रसेन अनंत बेर्डे वय ४९ वर्षे

**गुन्हयाची थोडक्यात हकिगत** — यातील फिर्यादी हिऱ्याचे व्यापारी असून त्यांची बॅक ऑफ इंडीया, ऑपेरा हाउस शाखा, मुंबई येथे ३४३ क्रमांकाचे लॉकर आहे. सदर लॉकरचा वापर ते व्यापारातील हिरे ठेवण्याकरीता करीत. ते सदर लॉकरमध्ये ४१८.१५ कॅरेट वजनाचे हिरे कि.रु. १ कोटी ६५ लाख किंमतीचे ठेवले होते. दि.२९.०३.१० रोजी त्याचे वडीलांनी लॉकरला भेट दिली असता फिर्यादी यांनी ठेवलेले वर नमुद हिरे त्याना दिसून आले नाहीत बॅकेत चौकशी करता कोणतीही उपयुक्त माहिती मिळाली नाही. परंतु कोणा अज्ञात इसमाने बनावट चावीच्या सहाय्याने सदरचे हिरे चोरुन नेल्याचे समजुन आले त्याप्रमाणे दा.भ.मार्ग पो. ठाणे येथे गु.र.क्र ८२/१० प्रमाणे गुन्हा नोद करण्यात आला.

सदर गुन्हयाचा समांतरपणे तपास गुप्रशा कक्ष—२ चे वपोनि पाटील व पथक करीत असताना सदर पथकाने गुन्हयातील फिर्यादी मेहूलकुमार तसेच बॅक मॅनेजर यांचेशी सतत संपर्कात राहून बॅकेच्या परिसरात पाळत ठेवून सी.सी.टी.व्ही कॅमेऱ्यातील चित्रीकरण तसेच, स्ट्रॉगरुम कस्टोडीयन नोंदवहीचा बारकाईने अभ्यास करुन लॉकर हाताळणाऱ्या व्यक्तीच्या वेळा, पध्दती याचाही बारकाईने अभ्यास केला. दरम्यान दि.१८.०१.११ रोजी वपोनि पाटील यांच्या खास बातमीदाराकडून माहिती मिळाली की, नमूद गुन्हयात सहभागी असलेला एक आरोपी बांद्रा पुर्व येथे येणार असल्याची

माहिती मिळाल्याने खेरवाडी या ठिकाणी सापळा रचून यातील **आरोपी शमसुददीन अहमदगणी आझमी वय ४७ वर्षे** यास ताब्यात घेतले. त्याचेकडे कौशल्याने केलेल्या चौकशीत त्याने त्याचे साथिदार नामे **१) फरीद आशमी वय ४७ वर्षे, २) अजय मेहता वय ४८ वर्षे, ३) चंद्रसेन बेरडे वय ४९ वर्षे** याचेसोबत सदर गुन्हा केल्याची कबुली दिली. त्यानुसार सदर चारही आरोपीतांना दिनाक १८.०१.११ रोजी सदर गुन्हयात अटक करण्यात आली. **त्याचेकडून एकुण १५ अशाच प्रकारचे गुन्हे उघडकीस आले आहेत.**

**एकंदरीत सदरचा गुन्हा सी.सी.टी.व्ही चित्रीकरण, स्ट्रॉगरुम नोदवहीतील इसम, तसेच संशयीत यांचा बारकाईने केलेला अभ्यास, बातमीदाराने दिलेली माहिती वरुन उघडकीस आणला आहे.**

**गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष—२,, गु.अ.वि., मुंबई** च्या नमुद पथकाने पोलीस कर्तव्यातील गुन्हे तपासाचा व्यवसायीक कस लावून सदरच्या अतिशय कठिण व किचकट गुन्हयाची उकल केल्याने **मा.पोलीस आयुक्तांनी त्यांना जानेवारी २०११ चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ** अर्थात उत्कृष्ठ गुन्हे शोधाचे पारितोषिक जाहिर केले आहे.

**तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांची नावे.....**

| | |
|---|---|
| १) प्र.पो.नि.निशिकांत पाटील/कक्ष—२,गु.प्र.शा. | ५) पो.ना.२८४४२/माळी/ कक्ष—२,गु.प्र.शा |
| २) पोउनि भास्कर कदम / कक्ष —२,गु.प्र.शा | ६)पोशि ९८०६३६/मिश्रा/कक्ष—२,गु.प्र.शा |
| ३) पो.ह.१९२३०/पाटील / कक्ष —२,गु.प्र.शा | ७) पोशि.२९८३४/शिंदे/ कक्ष—२,गु.प्र.शा |
| ४) पो.ना. २५५०७/पाटील/ कक्ष —२,गु.प्र.शा | ८) पोशि.०३७६०/शिर्के/कक्ष—२,गु.प्र.शा |

## बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ माहे जानेवारी २०११

## गुन्हे प्रकटीकरण शाखा कक्ष — ३ गु.अ.वि., मुंबई गु.प्र.शा.,गु.र.क्र ०७/११ वरळी पोलीस ठाणे गु.र.क्र २२८/१० कलम ४५४,४५७,३८० भा.दं.वि.

१) गु.र.क्र व कलम — वरळी पोलीस ठाणे गु.र.क्र २२८/१०, कलम ४५४,४५७,३८०भा.दं.वि.

२) गु.घ.दि व वेळ — दि. २८.०८.२०१० रोजी ०६.३० ते
दि. ०२.०९.२०१० रोजी १३.३० वा. दरम्यान

३) गु.दा.दि. व वेळ — दि. ०२.०९.२०१० रोजी १७.०० वा.

४) गुन्हा उघडकीस — दि.२२.०१.२०११ रोजी

५) फिर्यादी — विनय रोहिदास पाटील वय ३८ वर्षे,

६) बळीत — फिर्यादी

७) आरोपी अटक — १) समीर उर्फ सलीम फजले ईलाही खान वय २५ वर्षे,
२) मो.बादशहा उर्फ अन्वर मो.इस्माईल अन्सारी वय २८ वर्षे,
३) जाफर हुसेन उर्फ मोनी समीर हुसेन शेख वय २९ वर्षे
४) संजय शंकरलाल जैन वय ३४ वर्षे

**गुन्हयाची थोडक्यात हकिगत** — दिनांक २८.०८.१० ते दिनांक ०२.०९.१० या दरम्यान यातील फिर्यादी याचा टेक्स्टाईल व्यापार असून ते ३०२, पुर्णा वरळी सागर येथे राहतात ते कुटुंबासह गावी गेले होते. फिर्यादी यांनी त्याचे बेडरुम टाळे लावून बंद केला होता. घरी नोकर मंडळी राहण्यास होती दि.०२.०९.१० रोजी फिर्यादी घरी परतले तेव्हा बेडरुमचा दरवाजा बद नसल्याचे आढळुन आले परंतू दरवाजा घटट् असल्याने धक्का मारुन उघडावा लागला तेव्हा आतील कोयंडा व कडी निघुन पडली. तेव्हा बेडरुमची स्लाईडिंग उघडी दिसली व खाटेवर कपाटाच्या चाव्या मिळून आल्या. घरातील बॅगेत ठेवलेले सामान अस्ताव्यस्त पडलेले आढळुन आले. बारकाईन पाहणी केली असता रोख रक्कम, पिस्टल, इत्यादी कि.रु. १७ लाखाचा ऐवज चोरीस गेल्याचे दिसून आले. म्हणून समासात नमुद प्रमाणे गुन्हा नोद.

गुन्हयाचे घटनास्थळी कोणताही दुवा सोडलेला नसताना गुप्रशा कक्ष—३ चे पथकाने खास बातमीदारांकडून माहिती घेवून अशा प्रकारचे गुन्हे करणारे तसेच जामीनावर सुटलेल्या गुन्हेगारांची माहितीच्या आधारावर खास बातमीदारामार्फत यातील अटक आरोपीचे नाव निष्पन्न झाले.

अटक आरोपी समीर उर्फ सलीम फजले ईलाही खान वय २५ वर्षे, यास पश्चिम मिदनापुर, पश्चिम बंगाल येथे पथक पाठवून सदर गुन्हयात अटक करण्यात आले. त्याचेकडून सदर

गुन्हयातील चोरीस गेलेला माल सुमारे ९०० ग्रॅम वजनाचे सोने, एक पिस्टल, एक रिव्हॉल्वर असा एकुण रुपये २० लाख ५० हजाराचा ऐवज हस्तगत करण्यात आला

गुन्हे प्रकटीकरण शाखा, कक्ष—३ मुंबईच्या नमुद पथकाने पोलीस कर्तव्यातील गुन्हे तपासाचा व्यवसायीक कस लावून सदरच्या अतिशय कठिण व किचकट गुन्हयाची उकल केल्याने **मा.पोलीस आयुक्तांनी त्यांना जानेवारी २०११ चे बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ** अर्थात उत्कृष्ठ गुन्हे शोधाचे पारितोषिक जाहिर केले आहे.

**तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांची नावे....**

१) वपोनि प्रशांत मर्दे / कक्ष—३,गुप्रशा.

२) पोनि मनोहर धनावडे / कक्ष—३,गुप्रशा.

३) पोनि दिपक चव्हाण / कक्ष—३,गुप्रशा.

४) सपोनि विलास चौगुले / कक्ष—३,गुप्रशा.

५) पोउनि संभाजी धामणकर / कक्ष—३,गुप्रशा.

६) पोशिक्र १०४०५/ सुधाकर उथळे/कक्ष—३,गुप्रशा.

७) पोशिक्र ३३२४० /गुलाबराव फाफाळे/कक्ष—३,गुप्रशा.

८) पोशिक्र ३४५२९/निलेश कदम/ कक्ष—३,गुप्रशा.